


# भूमिगत मेट्रोने या, लोकल गाठा

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## मेट्रो-3 चे काम आले सीएसएमटी सब-वे पर्यंत

मुंबईकरांना पुढील दोन वर्षांत भूमिगत मेट्रोने येऊन लगेचच पुढील प्रवासासाठी लोकल गाठता येणार आहे. तशा संरचनेचे काम मेट्रो-३ द्वारे जोमाने सुरू आहे. यासंबंधीचे खोदकाम सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्ग अर्थात सब-वेपर्यंत आले आहे.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी मेट्रो-३ रेल्वे मार्गाची उभारणी सुरू आहे. 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' असे नाव असलेल्या प्रकल्पाचे दक्षिणेकडील टोक कफ परेड तर उत्तरेकडे सारिपूतनगर (आरे कारशेड) असेल. त्यातील पहिला टप्पा आरे ते बीकेसी उत्तर असून तो डिसेंबर २०२३ ला सुरू होणार आहे. तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड असेल. डिसेंबर २०२४मध्ये सुरू होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातच 'सीएसएमटी मेट्रो स्थानक' आहे. तांत्रिकदृष्ट्या हे स्थानक आझाद मैदान येथे आहे. याच आझाद मैदानातून भुयारी मार्गाने थेट सीएसएमटी येथे येऊन प्रवाशांना लोकलसाठी जाता येणार आहे.

प्रवाशांना बाहेर न येता जमिनीखालून थेट लोकल स्थानक गाठता यावे, यासाठी भुयारी मार्गाचे काम जोमाने सुरू आहे. हे खोदकाम आता आझाद मैदानाकडून सध्याच्या भुयारी मार्गापर्यंत आले आहे. यासाठी कॅनन पावभाजी केंद्राकडे प्रवेश असलेल्या भुयारी मार्गाजवळील काही दुकाने पाडण्यात आली आहेत. तिथपर्यंत मेट्रो प्रशासनाने खोदकाम केलेले दिसून येत आहे. खोदकाम सुरू असल्यानेच हा भुयारी मार्ग, मेट्रो रेल्वे प्रशासनाने बॅरिगेट लावून बंद केला आहे. मेट्रो सुरू झाल्यानंतर आझाद मैदान येथे उतरून खाऊ गल्ली व महापालिकेकडे येणाऱ्या रस्त्याच्या मधून भुयारी मार्गाने भविष्यात सीएसएमटी स्थानक गाठता येणार आहे.